ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक प्रशिक्षण आणि त्यातील समस्या

**प्रा. धायगुडे अनिता कुमार**

*अध्यापक महाविद्यालय ,वडगाव मावळ*

## Abstract

*शिक्षक -प्रशिक्षणाचा इतिहास फार जुना आहे. ब्रीटीशांच्या काळापासून शिक्षक - प्रशिक्षणाला सुरवात झाली. आज शिक्षक प्रशिक्षण कोणत्या टप्प्यातून जात आहे ? त्यामध्ये कोणते बदल झाले ? आज समाजात शिक्षक प्रशिक्षणाची स्थिती कशी आहे हे जाणून घेणे महत्वाचे आहे. शिक्षक प्रशिक्षणाचा कालावधी दोन वर्षाचा केल्याने त्याचे परिणाम समाजावरती पडणार आहेत. भविष्यात त्याचे दुरगामी परिणाम समजून घेणे गरजेचे आहे. आपल्या शिक्षण व्यवस्थे मध्ये विद्यार्थ्यांची किती वर्ष शिक्षण घेण्यामध्ये जातात याचा अभ्यास होणे गरजेचे आहे . समाजामध्ये शिक्षक - प्रशिक्षण अभ्यासक्रमाबाबत जी नकारात्मक भूमिका तयार झाली आहे त्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी वरील विषयाची निवड केली गेली आहे.*

*शासनाने धोरण ठरवत असताना समाजाची सद्यस्थिती चा अभ्यास करून निर्णय घेतल्यास त्याचा चांगला परिणाम होइल . मराठी माध्यमाच्या श व सरकारी शाळांची स्थिती फारशी चांगली नाही . यासर्वाचा परिणाम शिक्षक - प्रशिक्षणावरती होत आहे . वाढत्या खाजगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा यामुळे शिक्षक - प्रशिक्षण संस्थावरती काय परिणाम होतील हे जाणून घेतले पाहिजे १९९० सालापासून कार्यरत असणा-या व कायम विना अनुदान या तत्वावरती चालणा-या शिक्षक - प्रशिक्षण संस्था वरती याचे काय परिणाम होतील हे पहाणे गरजेचे आहे कारण २५ वर्ष एखाद्या संस्थेत काम करत असताना अचानक तिच्या बंद पडण्याने तेथील कर्मचा-यांच्या स्थितीचा अभ्यास करणे जास्त गरजेचे आहे.*

*Scholarly Research Journal's* **is licensed Based on a work at www.srjis.com**

**प्रस्तावना :** भारतामध्ये शिक्षक प्रशिक्षणाची सुरवात ब्रिटीशकाळापासून झाली. स्वातंत्र मिळाल्यानंतर १९७३ पर्यत शिक्षक प्रशिक्षणासाठी वेगळी संस्था नव्हती. १९७३ ला नॅशनल कौंसिल फॉर टिचर एज्युकेशन [NCTE] ची स्थापना झाली. परंतु तिला कोणतेही कायदेशिर अधिकार नसल्याने तिचा फारसा प्रभाव शिक्षक प्रशिक्षणातील योजनांवरती जाणवला नाही. परंतु १९८६ च्या राष्ट्रीय १शैक्षणिक धोरणातील शिफारशीमुळे १९९३ पासून एन.सी.टी.इ ही स्वायत्त संस्था म्हणून ओळखली जावू लागली. दिल्ली येथे मुख्य कार्यालय व जयपूर , बेंगलोर ,भुवनेश्वर व भोपाळ येथे क्षेत्रिय कार्यालय कार्यरत आहेत. यांचा

**मुख्य उद्दिष्टे**

१. संपूर्ण देशातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व देखरेख करणे.

२. शिक्षक प्रशिक्षणातील प्रमाण व नियम यांचे मूल्यांकन करणे.

हे आणि असे इतर ज्यातून शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत शासनाची धोरणे व कार्यपध्दती :

शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची धोरणे ही मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत निश्चीत केली जातात. त्यांची अंमलबजावणी एन०सी.टी.इ कडून केली जाते. एन.सी.टी.इ या साठी मार्गदर्शक तत्वे सर्व राज्यसरकारांकडे देतात . त्याप्रमाणे राज्यसरकार व विद्यापीठ अभ्यासध्माची मांडणी करतात . अशा प्रकारे छब्ज्म च्या मार्गदर्शक तत्वानुसार शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते .

२००५ पर्यत संपूर्ण देशामध्ये मर्यादित प्रमाणात डी.एड , बी.एड व एम. एड महाविद्यालयांची संख्या होती . २००५ च्या राष्ट्रीय १शैक्षणिक धोरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यावरती भर दिला होता. २००९ ला शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाउल उचलले गेले. ते म्हणजे **शिक्षण हक्क कायदा** . या कायद्यसनुसार ६ ते १४

वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे. यामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.

परंतु शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची धोरणे २००७ पासून बदलण्यात आली. त्यानुसार सर्व राज्यामध्ये शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाना परवानगी देण्यात आली. जानेवारी २००७ मध्ये संपूर्ण देशभरात ७४६१ महाविद्यालयांना परवानगी देण्यात आली. यामध्ये ७.७२ छात्र - शिक्षक शिक्षण घेवू शकतात.

**शासनाच्या धोरणांचा परिणाम :**

१. प्रत्येक राज्यात शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांची संख्या मोठयाप्रमाणात वाढली. त्यामुळे प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता निर्माण झाली.

२. महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होवु लागली .

विद्यार्थी संख्या कमी होण्याची कारणे : १. वाढती महाविद्यालयांची संख्या

२. बेकारीचे प्रमाण वाढले त्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला.

३. नोकरीची शाश्वती कमी झाली .

४. शिक्षक भरती बंद केल्याने प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला . त्यामुळे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलला.

५. महाविद्यालयांना परवानगी देताना राज्य शासनाची ना हरकत घेण्याची अट शिथील केली. त्यामुळे महाविद्यालयांना परवानगी देताना राज्य शासनाच्या सूचनांचा विचार केला गेला नाही.

**शासनांच्या धोरणांची कारणमिमांसा :**

१. केंद्र शासनाची ध्येय धोरण ठरवत असताना राज्य शासन , व केंद्र सरकार यांच्यात समन्वयाचा अभाव.

२. राज्य सरकारच्या शैक्षणिक धोरणांचा विचार नाही. राज्य सरकारचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार काढण्यात आले.

३. मागणी व पुरवठा या तत्वाचा विचार न करता परवानगी देण्याचे धोरण.

४. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करत असताना ज्ञानाचा स्फोट न होता संख्यात्मक स्फोट झाला त्यामुळे प्रज्ञावान लोकांची कमतरता निर्माण झाली. धोरणात्मक परिणामाबरोबरच प्रशासकीय , संस्थात्मक व सामाजिक पातळीवर याचे दुरगामी परिणाम झालेले जाणवतात.

विद्यार्थ्यांना नोकरीची श्शाश्वती नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा ओघ कमी झाला. त्यामुळे त्याचा परिणाम गुणवत्तेवरती झाला.सर्वात प्रथम याचा परिणाम डी.टी. एड महाविद्यालयावर सर्व प्रथम दिसून आला.त्याची कारणे पुढील प्रमाणे :

**डी.टी.एड महाविद्यालयांवरील परिणाम** : डी.टी.एडचा अभ्यासकम हा दोन वर्ष इतक्या कालावधीचा होता त्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला. प्राथमिक श्शाळांची अवस्था सर्वच राज्यामध्ये समाधानकारक नसल्याने नोकरीची श्शाश्वती नव्हती . शिक्षक भरतीची प्रक्रिया थांबवल्याने इकडे येण्याचा ओघ इंग्रजी माध्यमाच्या श्शाळांचे प्रमाण वाढले. व मराठी माध्यमांच्या श्शाळामधील विद्यार्थी संख्या घटली . त्याचा परिणाम मराठी माध्यमाच्या श्शाळातील पटसंख्या कमी झाली. याचा परिणाम शिक्षक भरतीवरती झाला . नोकरीची श्शाश्वती संपल्याने गुणवत्तावान विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाकडे पाठ फिरवली. वाढलेली महाविद्यालये आणि रोडावलेली संख्या यामुळे महाविद्यालयामध्ये पुरेशी विद्यार्थी

संख्या नाही.

**शैक्षणिक परिणाम :**

१. वाढलेल्या महाविद्यालयांच्या संख्येमुळे सरावपाठांना शाळा मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या.
२. डी.टी.एड चा अभ्यासक्रमाची पुर्नरचना २००४ सालापासून २०१२ पर्यंत एकदाही केली नाही.त्यामुळे श्शालेय स्तरावरती जे बदल झाले त्याबदलांचे कोणतेही प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना मिळण्याची सोय अभ्यासक्रमात नाही. या

काळामध्ये प्रशिक्षण घेतलेले छात्र - शिक्षक या नविन बदलापासून अनभिज्ञ राहिले . या सर्वाचा परिणाम १शालेय गुणवत्तेवरती झाला .

३. राज्य सरकारांची शिक्षक -प्रशिक्षण या अभ्यासक्रमाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक राहिलेला नाही. अनास्थेनी या कार्यक्रमाचे नियोजन करत गेल्याने गुणवत्ता पूर्ण विद्यार्थ्यांना या पेक्षाकडे वळवण्यात १शासन अपयशी ठरलेले आहे .

४. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये धोरणे ठरवत असताना समन्वयाचा अभाव दिसून येतो

५. तसेच राज्यसरकार व डी.टी.एड महाविद्यालय यांच्या मध्ये आंतरक्रिया योग्य पध्दतीने होताना दिसून येत नाही .याचा प्रत्यय कोणतेही प्रशिक्षण कार्यक्रम राबवत असताना झालेला दिसून येतो. ज्या प्रभावी पणे प्रशिक्षण कार्यक्रम होवून त्याची अमलबजावणी होणे अपेक्षित आहे त्यापध्दतीने होताना दिसत नाही .

६. एन.सी.टी.इ ची धोरणे ठरवत असताना राज्याच्या शैक्षणिक धोरणांचा विचार केला जात नाही.

७. २००५ नंतर ज्या वेगाने महाविद्यालयांची संख्या वाढली त्याच वेगाने २०१२ नंतर महाविद्यालये त्याच वेगाने बंद करण्याचे पत्र संस्था चालकांनी राज्य सरकारला दिले. कारण अपुरी विद्यार्थी संख्या असल्याने महाविद्यालय चालवणे संस्था चालकांना शक्य झाले नाही .

८.महाविद्यालये बंद झाल्याने उच्च शिक्षित बेकारांची संख्या वाढली .१

९. १शासनाचे शिक्षक पात्रता परिक्षेबाबतचे धोरण हे सतत बदलणारे असल्याने विद्यार्थ्यामध्ये संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. नोकरी नसणा-यांची संख्या मोठयाप्रमाणात आहे . त्यामुळे या अभ्यासक्रमाबदद्‌ल समाजामध्ये नाराजी व नकारात्माता निर्माण झालेली आहे.

ही सर्व अवस्था डी.टी.एड महाविद्यालयांची आहे. शासनाने २०१५ -१६ पासून बी.एड व एम. एड हे अभ्यासक्रम दोन वर्षाचे केलेले आहे. त्याची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून झालेली आहे. त्याचा परिणाम नेमका कसा होणार आहे हे येणारा काळ ठरवेल परंतु त्याच्या संभाव्य परिणामांची चर्चा आपण करूया.

**बी.एड व एम.एड** या अभ्यासक्रमासाठीची पात्रता पदवी ही आहे.पदवी पर्यतचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी तरूणांना २१ ते २२ वर्ष लागतात. त्यानंतर जर बी.एड करायचे असेल तर पुढील दोन वर्ष लागतील.लगेच जर नोकरी मिळाली तर ठीक नाही तर २ वर्ष पदवीत्तर शिक्षण घेण्यासाठी लागणार . त्यानंतर साधारणपणे कोणत्याही विद्यार्थ्याचे वय हे २४ ते २५ च्या पुढे असणार आणि त्यानंतर जर अर्थार्जन करणार असेल तर आपण शिक्षणासाठी आणि त्या व्यक्तिला स्वतःच्या पायावरती उभे करण्यासाठी किती वर्ष खर्च करणार आहोत ? याचा शैक्षणिक धोरण ठरवत असताना विचार होणे गरजेचे आहे . बी.एड व एम.एड पूर्ण होइपर्यत विद्यार्थ्याच्या आयुष्यातील ऐन उमेदीची वर्ष निघून गेलेली असणार . त्यानंतरही जर नोकरीची शाश्वती नसेल जर या अभ्यास□माकडे विद्यार्थी पाठ फिरवतील.

२. शिक्षक - प्रशिक्षणाचा कालावधी वाढवत असताना संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक होते. याचे कारण कोठारी आयोगापासून सर्वच आयोग व शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षक - प्रशिक्षणाचा कालावधी २ वर्षाचा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना होत्या.त्याप्रमाणे अभ्यास□माचा कालावधी वाढवला.परंतु आजची देशातील शिक्षक - प्रशिक्षणाची सद्यस्थितीचा विचार केला गेलेला दिसत नाही.

३. देशभरामध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळा अगदी ग्रामीण भागापासून सुरू झालेल्या आहेत . त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण ही संकल्पना हदपार होतेय कि काय ही भिती निर्माण झालेली आहे . इंग्रजी माध्यमाच्या शाळांवरती

सरकारचा अंकुश नसल्याने शिक्षक - प्रशिक्षणाला इंग्रजी माध्यमाच्या १शाळामुळे किती फायदा होईल हा एक वेगळ्या संशोधनाचा विषय आहे.

४. १शासन शिक्षणाचे खाजगीकरण करत असल्याने आणि शिक्षक - प्रशिक्षण हा व्यावसायिक अभ्यास□मात गणला जातो त्यामुळे यामध्ये गुंतवणूक करण्यास किती प्रतिसाद मिळेल हे निश्चित नाही .

या अशा प्रकारच्या अनेक समस्या शिक्षक - प्रशिक्षणामध्ये येणार आहेत .पण त्याचा वरती मात करून गुणवत्तापूर्ण शिक्षण शिक्षक - प्रशिक्षणामध्ये दिल गेल पाहिजे . यासाठी काय उपाययोजना करता येतील हे पाहू .

**उपाययोजना** :

१. शिक्षक - प्रशिक्षण अभ्यास□म हा पूर्णपणे १शासनाच्या अधिकारात असावा. ज्यामध्ये प्रत्येक राज्यातील प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणामधील प्रतिनीधी असावेत.

२. शिक्षक - प्रशिक्षण अभ्यास□माचा समावेश व्यावसायिक अभ्यास□मात न ठेवता इतर विद्याशाखामध्ये करावा .

३. उच्च शिक्षणामध्ये नेट - सेट असेल तर व्याख्याता म्हणून मान्यता मिळते परंतु अध्यापन हे १शास्त्र मानत असू तर मग त्यांच्यासाठी प्रशिक्षण अनिवार्य करावे व त्याची जबाबदारी शिक्षक - प्रशिक्षण देणा-या संस्थाकडे सोपवावी. ज्यामुळे उच्च शिक्षणामध्ये गुणवत्ता वाढीस मदत होईल.

४. १शासन सर्व स्तरातील शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणावरती करोडो रूपये खर्च करते तरी त्याचा प्रभावी परिणाम दिसून येत नाही. यासाठी प्रशिक्षणाची जबाबदारी प्रत्येक तालुक्यातील शिक्षक - प्रशिक्षण संस्थेंवरती द्यावी जेणे करून शिक्षक - प्रशिक्षण महाविद्यालयाना १शासकीय अनुदान मिळेल व १शासनाचा प्रशिक्षण कार्य□मावरील खर्च व वेळ वाचेल.

शिक्षक - प्रशिक्षणाची गुणवत्ता सुधारत असतानाच त्याच्याशी संबंधीत सर्व घटकांचा विचार केल्यास व समन्वय साधल्यास शिक्षक - प्रशिक्षण अभ्यास□म प्रभावीपणे राबवता येइल .

**संदर्भ सूची**

*www.google.com*

*www.wikipedia.com*